**प्रेस नोट** **ला.प्र.वि., जळगांव.**

**दि. २०/०१/२०२६**

**श्री.राजेंद्र अमृत सरदार, वनपाल, अहिरवाडी वनक्षेत्र, रावेर, जि.जळगाव. (खाते- वन विभाग वर्ग ३) व दिपक रघुनाथ तायडे, रा.अहिरवाडी, ता. रावेर,जि.जळगाव. (खाजगी इसम) यांच्याविरुध्द लाचमागणी व स्विकारल्याने कारवाई केलेबाबत.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | जळगांव. |
| **फिर्यादी** | योगेश गंगाधर ठाकूर, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि., जळगांव. |
| **पोलीस ठाणे व गुन्हा नोंद क्रमांक** | रावेर पो.स्टे., जि.जळगाव गु.र.नं. २२/२०२६. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७ अ व १२ प्रमाणे |
| **लाचेची मागणी रक्कम** | १५,०००/- रुपये स्विकारल्याचे मान्य केले. |
| **स्विकारली रक्कम** | दि.०७.०९.२०२४ रोजी फोन पे द्वारे १३,२५०/- रु व दि.०८.०९.२०२४ रोजी १,७५०/- रु रोख स्विकारले. |
| **थोडक्यात हकिगत** | यातील तक्रारदार हे वनरक्षक जिन्सी, वनक्षेत्र, रावेर यावल वनविभाग,जळगाव येथे कार्यरत असतांना वनपरिक्षेत्र अधिकारी संरक्षण व अतिक्रमण निर्मुलन यावल यांनी दि. ०५.०९.२०२४ व दि.०६.०९.२०२४ रोजी त्यांचे कार्यक्षेत्रातील रोप वनातील निंदणीचे कामाची तपासणी केलेली होती. तेव्हा आलोसे क्र.१ यांनी दि.०७.०९.२०२४ रोजी तक्रारदार यांना व्हॉट्सअप कॉल करुन, तक्रारदार यांना त्यांचे कार्यक्षेत्रातील निंदणीचे कामावरुन निलंबन करण्यात येणार असल्याचे सांगुन, निलंबन टाळायचे असल्यास श्री.बावणे वनपरिक्षेत्र अधिकारी यांना १५,०००/-रुपये द्यावे लागतील असे सांगुन सदरची लाच रक्कम आरोपी क्र.२ याचे फोन पे वर पाठवण्यास सांगीतली होती. परंतु तक्रारदार यांचेकडे फोन पे ॲप नसल्याने त्यांनी स्वत: चे मोबाईल मधील योनो ॲप मधुन १३,२५०/-रुपये त्यांचा मित्र याचे फोन पे ॲपवरुन सदरची रक्कम आरोपी क्र.२ याचे फोन पे ॲपवर पाठवुन त्याचा स्क्रिनशॉट तक्रारदार यांना पाठवला होता. सदरचा स्क्रिनशॉट तक्रारदार यांनी आलोसे क्र.१ यांना पाठवला असता त्यांनी १३,२५०/- रु प्राप्त झाल्याचे फोनद्वारे सांगितले.तसेच दि.०८.०९.२०२४ रोजी तक्रारदार यांनी आलोसे क्र.१ यांचे अहिरवाडी येथील शासकिय निवासस्थानी जावुन त्यांना १,७५०/-रुपये रोख दिले. अशाप्रकारे आलोसे क्र.१ यांनी तक्रारदार यांचे कडुन त्यांचे निलंबना संदर्भात १५,०००/-रुपये स्विकारले होते.<br>त्यानंतर दि.१२.०९.२०२४ रोजी वनसंरक्षक (प्रादेशिक) धुळे यांनी तक्रारदार यांना त्यांचे जिन्सी येथील रोपवनातील निंदणीचे काम न केल्यामुळे निलंबीत केले. सदरबाबत दि.१५. ०९.२०२४ रोजी तक्रारदार यांनी आलोसे क्र.१ यांची रावेर कार्यालयात भेट घेतली. तेव्हा त्यांनी तक्रारदार यांना निलंबनातून मुक्त करण्यासाठी वरिष्ठांना सांगून प्रयत्न करतो, त्यासाठी पैसे द्यावे लागतील असे सांगीतले होते. सदरबाबत तक्रारदार यांनी दि.१६.१०. २०२४ रोजी ला.प्र.वि.जळगाव घटकाचे सापळा पथकाकडे तक्रार लिहुन दिली होती.<br>त्याप्रमाणे दि.१६.१०.२०२४ रोजी सदर तक्रारीची पडताळणी केली असता लोकसेवक श्री.राजेंद्र अमृत सरदार, वनपाल यांनी वैयक्तीक प्रभावाचा वापर करुन, तक्रारदार यांना त्यांचे जिन्सी येथील रोपवनामध्ये निंदणी कामाचा तपासणी अहवाल मॅनेज करुन त्यांचे निलंबन होवु न देण्याचे मोबदल्यात यापुर्वी दि.०७.०९.२०२४ रोजी फोन पे ॲपवरुन १३,२५०/- रु व दि.०८.०९.२०२४ रोजी १७५०/- रु रोख स्वरुपात स्विकारल्याचे पंचासमक्ष मान्य केले. तसेच तक्रारदार यांचे निलंबन झाल्यानंतर त्यांना निलंबनातून मुक्त करण्यासाठी वरिष्ठांना सांगून प्रयत्न करतो असे आश्वासन दिले. त्यावेळी आलोसे क्र.१ यांनी तक्रारदार यांचेवर वैयक्तीक प्रभाव पाडुन, श्री.बावणे, वनपरिक्षेत्र अधिकारी रावेर यांना पैसे देण्याची तयारी ठेव, असे सांगुन स्वत:साठी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने लाच रक्कम मिळवण्याची व्यवस्था केली. |

| | |
|---|---|
| | अशाप्रकारे आलोसे क्र.१ यांनी तक्रारदार यांना त्यांचे जिन्सी येथील रोपवनामध्ये निंदणी कामाचा तपासणी अहवाल मॅनेज करुन त्यांचे निलंबन होवु न देण्याचे मोबदल्यात दि.०७.०९.२०२४ रोजी फोन पे ॲपवरून १३,२५०/- रु व दि.०८.०९.२०२४ रोजी १७५०/- रु रोख स्वरुपात स्विकारले. तसेच तक्रारदार यांचे निलंबन झाल्यानंतर त्यांना निलंबनातून मुक्त करण्यासाठी वरिष्ठांना सांगून प्रयत्न करतो असे आश्वासन दिले. त्यावेळी आलोसे क्र.१ यांनी तक्रारदार यांचेवर वैयक्तीक प्रभाव पाडुन, श्री.बावणे, वनपरिक्षेत्र अधिकारी रावेर यांना पैसे देण्याची तयारी ठेव, असे सांगुन स्वत:साठी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने लाच रक्कम मिळवण्याची व्यवस्था केली. तसेच आरोपी क्र. २ यांनी स्वत:चे फोन पे ॲपवर आलोसे क्र. १ यांच्या सांगण्यावरून १३,२५०/- रू. स्विकारून त्यापैकी त्यांना १३,०००/-रुपये लाच रक्कम एटीएम मधुन काढुन देवुन, लाच रक्कम स्विकारण्यासाठी मदत केली म्हणुन दोघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. |
| **सापळा कारवाई** | **सापळा अधिकारी**- श्री.योगेश ठाकुर, पोलीस उप अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव.<br>**सापळा पथक** - श्रे.पो.उप.नि./दिनेशसिंग पाटील, पोहेकॉ/किशोर महाजन, पोकॉ/प्रदिप पोळ, पोकॉ/राकेश दुसाने, सर्व नेम.ला.प्र.वि., जळगांव.<br>**तपासी अधिकारी** - श्री हेमंत नागरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., जळगांव. |
| **मार्गदर्शन** | **१) मा.श्री.भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.**<br>२) मा.श्री.माधव रेड्डी,अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>३) मा.श्री.सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र नाशिक येथे सपंर्क करावा.

**संपर्क पत्ता** :- अल्पबचत भवन, पहीला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ला.प्र.वि., जळगाव.
**संकेतस्थळ** :- acbmaharastra.gov.in
**ई मेल/ऑनलाईन तक्रार** :- spacbnashik@mahapolice.gov.in, dyspacbjalgaon@gmail.com
**टोल फ्रि क्रमांक** :- १०६४
**दुरध्वनी क्रमांक** :- ०२५७-२२३५४७७.
**व्हॉट्सअप मोबाईल क्रमांक** :- ७५८८६६१०६४.